# लिलावा बाबतची सूचना

कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर या कार्यालयातील निरुपयोगी (भंगार) साहित्याची **जसे आहे त्या स्थितीत** जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. ज्या अधिकृत परवानाधारक खरेदीदाराची बोली अधिकतम असेल अशा खरेदीदारास सदरील साहित्याची विक्री करण्यात येईल. सदर साहित्याची यादी व साहित्य दि. २६/०६/२०२५ ते दि. ०७/०७/२०२५ यादरम्यान (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० पर्यंत कार्यालयामध्ये पाहण्यासाठी उपलब्ध राहील.

सदर लिलावा पद्धतीबाबतची माहिती तसेच लिलावाच्या अटी व शर्ती वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या संकेतस्थळ https://www.vnmkv.ac.in वर उपलब्ध आहेत.

सदर साहित्याची विक्री करण्याचे तसेच विक्री व प्रक्रिया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्वाधिकार लिलाव समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**लिलावाचा दिनांक व वेळ** :- बुधवार दिनांक ०९ जुलै २०२५ वेळ : सकाळी ११:०० वाजता

**स्थळ :-** कृषि विज्ञान केंद्र, लातूर रोड, तुळजापूर पिन ४१३६०१

**भ्रमणध्वनी क्रमांक :- ९४२३३४७२८० / ९८९०४८८९६५**

कार्यक्रम समन्वयक
कृषि विज्ञान केद्र, तुळजापूर

<u>**निरूपयोगी (भंगार) साहित्याच्या लिलाव पध्दतीबाबतची माहिती**</u>

कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर या कार्यालयातील निरूपयोगी (भंगार) साहित्याची जाहीर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. सदर भांडार साहित्याची यादी व साहित्य कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर या कार्यालयातील भांडार विभागामध्ये पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

**जाहीर लिलावाची संक्षिप्त पध्दत-**

१. सदर साहित्याच्या लिलाव प्रक्रियेत सहभाग घेणारे व्यक्ती, खरेदीदार, संस्था यांच्याकडे अधिकृत परवाना असावा. अशा व्यक्ती, खरेदीदार, संस्था यांची कागदपत्रे तपासून पात्र असलेल्यांनाच या लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल.

२. ईच्छुक व्यक्ती, खरेदीदार यांना लिलाव प्रकियेत सहभाग घेण्यासाठी त्यांचेकडील अधिकृत परवाना पत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र इ. लिलावाच्या दिवशी अगोदर कार्यालयाकडे सादर करावे लागेल. तसेच या कार्यालयाच्या अटी, शर्ती मान्य असल्याचे साध्या कागदावर शपथपत्र द्यावे लागेल.

३. सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी परतावा अनामत रक्कम (EMD) रू.५,०००/- (अक्षरी रूपये पाच हजार फक्त) चा धनाकर्ष (DD) कार्यालयामध्ये जमा करावा लागेल. हा धनाकर्ष (DD) **Programme Co-ordinator, KVK, Tuljapur** या नावाने काढण्यात यावा.

४. सदर लिलाव प्रक्रियेतील साहित्याची यादी व साहित्य खरेदीदार व्यक्ती व संस्था यांना पाहण्यासाठी या कार्यालयात दि.२६/०६/२०२५ ते दि.०७/०७/२०२५ यादरम्यान (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. **तसेच लिलाव दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता कृषी विज्ञान केंद्र, लातूर रोड, तुळजापूर येथे घेण्यात येईल.**

५. सदर साहित्यामध्ये लोंखड, पत्रा, प्लास्टिक, फायबर, लाकुड, इलेक्ट्रानिक वस्तू, प्रयोगशाळेतील उपकरणे इत्यादी प्रकारचे साहित्य आहे.

६. लिलाव प्रकियेतील साहित्य हे जुने व निरूपयोगी असून, हे साहित्य ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत आपणास मिळेल. त्यामुळे या साहित्याची व्यवस्थित पाहणी करूनच आपण आपली बोली बोलावी. त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

७. ज्या व्यक्तीचे, खरेदीदाराचे, संस्थेचे दर/बोली अधिकतम असेल, त्यांनाच सदर साहित्य विक्री करण्यात येईल.

८. सदर साहित्याची विक्री करण्याचे तसेच कोणत्याही वेळी सदर लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार हे लिलाव समितीकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

# <u>लिलावासाठीच्या अटी व शर्ती</u>

१. सदर साहित्याची व्यवस्थित पाहणी करूनच खरेदीदार व्यक्ती व संस्था यांनी आपली बोली लावावी. नंतर आपली कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
२. सदर साहित्य कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पाहण्यास मिळेल.
३. परतावा अनामत रक्कम रू.५,०००/- धनाकर्ष (DD) व्दारे भरल्याशिवाय लिलाव प्रकियेत सहभाग घेता येणार नाही.
४. ज्या अधिकृत परवानाधारक खरेदीदाराची बोली अधिकतम असेल, त्यांनी साहित्याच्या एकुण रकमेच्या ५० टक्के रक्कम लिलावाच्या दिवशीच कार्यालयाच्या खात्यावर धनादेशाव्दारे अथवा ऑनलाईन पध्दतीने जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. आपला सहभाग रद्द करण्यात येईल. या बाबत समितीचा निर्णय अंतीम असेल.
५. अधिकतम बोली असणाऱ्या व्यक्ती खरेदीदाराने १० दिवसाचे आत उर्वरीत रक्कम जमा करून सदरील भांडार साहित्य आपल्या ताब्यात घ्यावे. उर्वरीत रक्कम १० दिवसात न भरल्यास १३ टक्के व्याज दराने व्याज आकारण्यात येईल. ही मुदत फक्त १५ दिवसाची राहील. त्यादरम्यान रक्कम न भरल्यास बोलीच्या दिवशी आपणाकडून भरलेली ५० टक्के रक्कम जप्त करण्यात येईल व झालेली विक्री रद्द करण्यात येवून क्रमांक २ वरील खरेदीदार व्यक्तीचा विचार करण्यात येईल.
६. ज्या व्यक्ती/ खरेदीदाराची बोली कमी रकमेची असेल, त्यांची अनामत रक्कम त्यांना लिलाव प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर परत करण्यात येईल.
७. सदर साहित्याचा ताबा देण्याची व्यवस्था या कार्यालयाकडून करण्यात येईल. ताब्यात दिलेले साहित्य घेऊन जाण्याची जबाबदारी आपली राहील. साहित्य नेतांना कोणत्याही शासकीय वस्तूचे, वाहनाचे अथवा कार्यालयाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा आपण त्यास जबाबदार राहाल.
८. सदर साहित्य खरेदीदार व्यक्तीने खरेदी रकमेवर शासन नियमानुसार असलेला जीएसटी भरणे बंधनकारक राहील व त्याबाबतची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
९. वरील अटी व शर्ती आम्हास मान्य व बंधनकारक असून, त्याचे अधीन राहून आम्ही सदर साहित्य खरेदी करण्यास तयार आहोत, आमची काहीही तक्रार राहणार नाही असे हमीपत्र/शपथपत्र साध्या कागदावर देणे बंधनकारक राहील.